# ज्योतिर्मय

Online Journal of Literature....

साहित्याचे विद्यापीठ

❑ पुणे ❑ वर्ष १ ले ❑ अंक २५ वा ❑ रविवार दि.२३ फेब्रुवारी २०२५ ❑ पाने ४ ❑ मूल्य : निशुल्क (खासगी वितरणासाठी)


## विशेष लेख...

## रोबोट डॉन चीनच्या रस्त्यावर उतरला

– प्रा डॉ सुधीर अग्रवाल

ज्योतिर्मय साहित्य

चीनमध्ये दररोज नवीन तंत्रज्ञान येत आहे. चीन अनेक वेळा अशा गोष्टी सादर करतो की संपूर्ण जग आश्चर्यचकित होते. उदाहरणार्थ, रोबोट्सचे उदाहरण घ्या; ते आता अनेक देशांमध्ये विविध कारणांसाठी वापरले जात आहेत. पण चीन इतर देशांच्या विचारसरणीपेक्षा चार पावले पुढे गेला. चीनने आता RT-G सादर केले आहे. हा एक गोल आकाराचा पोलिस रोबोट आहे जो एआयने सुसज्ज आहे.हा एआय रोबोट गुन्हेगारांना पकडण्यासाठी आणि गर्दी नियंत्रित करण्यासाठी अत्यंत प्रभावी ठरणार आहे.

हा प्रगत रोबोट जमीन आणि पाणी दोन्ही ठिकाणी काम करण्यासाठी डिझाइन करण्यात आला आहे. खराब रस्ते आणि खडबडीत भूभागावरही धावण्यासाठी डिझाइन केलेले आहे. गुन्हेगारांचा शोध घेण्यासाठी, पकडण्यासाठी आणि त्यांचा सामना करण्यासाठी रोबोट्समध्ये अनेक प्रगत तंत्रज्ञानाचा वापर करण्यात आला आहे.

या रोबोटचे वजन सुमारे १२५ किलो आहे. त्यात एआयचा समावेश करण्यात आला आहे. या गोलाकार आकाराच्या रोबोटमध्ये नेट गन, टीअर स्प्रे इत्यादी अनेक उपकरणे देखील आहेत. ते ताशी ३५ किलोमीटर वेगाने धावू शकते.

स्वीडनच्या उप्साला विद्यापीठाच्या संशोधनातून प्रेरित होऊन हा रोबोट बनवण्यात आला आहे. हे चीनच्या झेजियांग विद्यापीठाने विकसित केले आहे. या रोबोटचे बांधकाम २०१७ मध्ये सुरू झाले.

हा रोबोट चीनच्या रस्त्यांवर पोलिसांसोबत गस्त घालताना दिसत आहे. याचा वापर दहशतवादविरोधी सराव, अग्निशमन आणि आपत्कालीन परिस्थितींसाठी केला जाईल, तसेच नदीतील प्रदूषण शोधण्यासाठी देखील केला जाईल. त्याची किंमत ४५ लाख रुपये असल्याचे सांगितले जात आहे.

चीनमध्ये रोबोटचा वापर होण्याची ही पहिलीच वेळ नाही. याआधीही शेन्झेनमध्ये रोबोट फिरताना दिसले होते. याचा व्हिडिओही व्हायरल झाला होता. तो रोबोटही त्याच कंपनीने बनवला होता. याचे नाव SE01 होते. हा रोबोट १.७ मीटर लांबीचा होता.कंपनीचे म्हणणे आहे की, SE01 माणसांप्रमाणे अनेक कामे करू शकतो. यात स्कॅट्स, पुश-अप्स, स्पिनिंग, रनिंग सह इतर अनेक कामे करता येतात. सध्या जगभरातील इतर रोबोटसाठी माणसांप्रमाणे चालणे हे मोठे काम आहे. चीन या क्षेत्रात वेगाने काम करत असून पोलिस अधिकारी म्हणून रोबोटचा वापर करणे हे मोठे यश आहे.चीनमधील या प्रगतीकडे जगातील इतर देशांचेही लक्ष लागले आहे. कदाचित त्यामुळेच ॲपल आणि मेटासारख्या कंपन्याही या क्षेत्रात काम करत आहेत. असे मानले जात आहे की एआय रोबोटही पुढची मोठी गोष्ट असेल, जी जगभरात काम करण्याची पद्धत बदलू शकते. त्यांचा उपयोग घरगुती कामातही होऊ शकतो.

# प्रेम, संवाद, सहवास, सहनशीलतेमुळे मराठीचा अमराठीशी सुखाने संसार !

## साहित्य संमेलनातील परिसंवादाचा सूर

ज्योतिर्मय साहित्य

**नवी दिल्ली –** प्रेम, संवाद, सहवास आणि सहनशीलतेमुळे संसार सुरळीत होतोय असा सूर अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनातत आयोजित 'मनमोकळा संवाद मराठीचा अमराठी संसार' या परिसंवादातून निघाला.

अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या दुसऱ्या दिवशी "मनमोकळा संवाद मराठीचा अमराठी संसार" या विषयावरील परिसंवादात माजी सनदी अधिकारी डॉ. ज्ञानेश्वर मुळे आणि डॉ. साधना शंकर, रेखा रायकर आणि मनोज कुमार , ज्येष्ठ पत्रकार राजदीप सरदेसाई आणि सागरिका घोष, गायिका उद्योजक डॉ. मंजिरी वैद्य आणि प्रसन्न अय्यर या मान्यवरांनी सहभाग घेतला. विशेष पाहुणे म्हणून भारती विद्यापीठाचे कार्यवाह आमदार डॉ. विश्वजीत कदम उपस्थित होते. या परिसंवादाचे संयोजन अस्मिता पांडे आणि बाळ



कुलकर्णी यांनी केले होते.

परिसंवादादरम्यान मराठी-अमराठी संसारातील संवाद, संस्कृतीतील भिन्नता, कौटुंबिक नातेसंबंधांवरील परिणाम आणि मुलांच्या भाषिक जडणघडणीसंदर्भातील मुद्द्यांवर चर्चा झाली. भाषेमुळे एकमेकांशी संवाद होत असतो त्यामुळे अधिक व्याकरणात न पडता अधिकाधिक लोकांनी संवाद आपल्या आपल्या मातृभाषेत साधला पाहिजे असे एक मत या परिसंवादात व्यक्त झाले.

परिसंवादात सहभागी झालेल्या सर्वच मान्यवरांनी वैवाहिक जीवनातील भाषिक गमतीजमती उलगडल्या, तर डॉ. ज्ञानेश्वर मुळे यांनी विविध भाषांमधील संवादाने समजुतीला कसा हातभार लावला याची माहिती दिली. मनोज कुमार यांनी आपणास मराठी पूर्णपणे समजत असून मराठी सिनेमा आणि नाटकाचे चाहते असल्याचे त्यांनी सांगितले. सागरिका घोष मराठीतले काही शब्द हिंदीत वेगळा अर्थ निघतो मूळ अर्थ कळल्यावर आलेले हसू रोखता आले नाही असा अनुभव सांगितला. डॉ. साधना शंकर सासुबाईसोबत भाषेतून आणि भावनेतून झालेला संवाद एकमेकांसाठी पुरेसा होता. मराठी येत नसल्यामुळे सासुबाई मनसोक्त व्यक्त व्हायच्या, ही आठवण त्यांनी ताजी केली. डॉ. मंजिरी वैद्य तमिळ कुटुंबात गेल्यावर पाल या शब्दाला दूध असे म्हटल्याने निर्माण झालेल्या गमतीचा अनुभव त्यांनी सर्वांसमोर मांडला. सासरचे कुटुंब मोठे सर्वांनी सांभाळून घेतल्याचे रेखा रायकर यांनी सांगितले.

परिसंवादाच्या शेवटी भाषिक विविधता हा अडथळा न ठरता समृद्धीचे साधन ठरू शकतो, असा सकारात्मक सूर उमटला.

# मराठी तरुणांनी आवडीच्या क्षेत्रात समर्पित भावनेने काम करावे, मराठी पाऊल पडते पुढे या चर्चासत्रातील सूर

ज्योतिर्मय साहित्य

**नवी दिल्ली –** मराठी तरुणांनी आपल्या आवडीच्या क्षेत्रात समर्पित भावनेने काम केल्यास निश्चित यश मिळते, असा सूर अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या दुसऱ्या दिवशीच्या पहिल्या सत्रातील मराठी पाऊल पडते पुढे या चर्चासत्रात उमटला.

नवी दिल्ली येथे आयोजित अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या दुसऱ्या दिवसातील पहिल्या सत्रात "मराठी पाऊल पडते पुढे" या डॉ. बाबासाहेब आंबेडकर व्यासपीठावर आयोजित चर्चासत्रात बीव्हीजी समूहाचे हणमंतराव गायकवाड, ज्येष्ठ उद्योजक रवी पंडित, ज्येष्ठ पत्रकार पराग करंदीकर व वृत्त निवेदक प्रसन्न जोशी सहभागी झाले होते.

श्री हणमंतराव गायकवाड म्हणाले, मराठी संस्कृती दहीहंडीसारखी असावी, एकमेकांना हातभार लावून पुढे नेणारी असावी. प्रत्येकाने आपल्या आयुष्यात आपल्याला काय काम करायचे आहे ते ठरविणे महत्त्वाचे आहे. प्रत्येकाची आनंदाची व्याख्या वेगवेगळी आहे, आपल्याला ज्या क्षेत्रात आनंद मिळतो तो मिळवावा असे सांगतानाच मला रोजगार, आरोग्य व शेतकरी बांधवांसाठी काम करण्यात आनंद आहे. असे काम करा असा सल्लाही त्यांनी दिला.

मराठी तरुणांनी आपले आवडते क्षेत्र निवडावे व त्या क्षेत्रात झोकून देऊन काम करावे, असे सांगून श्री गायकवाड म्हणाले, आपल्या देशाच्या प्रगतीसाठी देशातील शेतकऱ्यांची प्रगती अत्यंत महत्त्वाची आहे. गावातच सर्व सुविधा मिळतील अशा दृष्टीने नियोजनही महत्त्वाचे आहे. गावातच उत्पन्नाचे स्रोत कसे वाढविता येतील त्यासाठी काम करावे लागणार आहे. आपण दहा लाख रोजगार निर्मितीचे उद्दिष्ट ठेवून काम करत असल्याचेही श्री गायकवाड यांनी सांगितले.

छत्रपती शिवाजी महाराज व स्वामी विवेकानंद यांचा आदर्श समोर ठेवून आपण काम करत असल्याचे सांगून श्री. गायकवाड म्हणाले, बीव्हीजी समूहाचा आठ लोकांचा प्रवास आज एक लाख लोकांपर्यंत पोहोचला आहे. अमेरिकेतही बीव्हीजी ग्रुप काम करत असून जगभर बीव्हीजी ग्रुपच्या माध्यमातून काम विस्तारण्याचा आमचा प्रयत्न आहे. जगात खूप संधी आहेत संधीचा आपण शोध घेतला पाहिजे. कोणतेही काम लहान नाही. आपण निवडलेले काम समर्पित भावनेने करा, असे श्री गायकवाड म्हणाले.

उद्योजक श्री. रवी पंडित म्हणाले, आपण आपल्या क्षेत्रात काम करताना ते काम चांगले असेल तर तेच काम आपली ओळख निर्माण करते. आपल्या वागण्या बोलण्यातून आपले व्यक्तिमत्व ठरते. आपण आपल्या क्षेत्रात ध्येयाने प्रेरित असाल तर लोकही मागे उभे राहतात. त्यासाठी आपला उद्देश चांगला पाहिजे. नवीन उद्योजक स्वतः च्या बळावर पुढे जात आहेत. छत्रपती शिवाजी महाराज, संत ज्ञानेश्वर महाराज, संत तुकाराम महाराज यांचा आदर्श महत्त्वाचा आहे. आपल्या देशाला पुढे नेण्यासाठी प्रत्येकाला आपल्या क्षेत्रात समर्पित भावनेने काम करावे लागणार आहे. उल्लेख श्री पंडित



यांनी यावेळी केला.

ज्येष्ठ पत्रकार श्री पराग करंदीकर म्हणाले, प्रत्येक क्षेत्रात मराठी पाऊल पुढे पडते आहे ही आनंदाची बाब आहे. आपल्याला प्रगतीसाठी सर्वसामावेशक व्हावे लागणार आहे. आपण ज्या क्षेत्रात काम करतो त्या क्षेत्रातील छोट्या-मोठ्या नोंदी आपल्याला ठेवाव्या लागणार आहेत. इतिहासाचे भान ठेवून वर्तमान कवेत घेऊन भविष्याचे नियोजन करावे लागणार आहे. वर्तमानाचा वेध घेताना भविष्याची बांधणी होऊ शकते असेही ते म्हणाले.

प्रत्येकाने आपले ध्येय साध्य करण्यासाठी सर्वतोपरी व प्रामाणिकपणे केलेले प्रयत्न महत्त्वाचे आहेत. आपल्याला वेळेचे नियोजन अत्यंत बारकाईने करावे लागणार आहे. प्रत्येक गोष्ट शिकण्याची वृत्ती बाळगावी यश निश्चित मिळेल असा विश्वास श्री करंदीकर यांनी व्यक्त केला.

वृत्त निवेदक प्रसन्ना जोशी यांनी देशाने उद्योग तसेच विविध क्षेत्रातल्या प्रगतीत आपला सहभाग, उद्योजकांचे योगदान व सद्यस्थितीत सुरू असलेल्या बदलाबाबत प्रश्न मांडण्याचा प्रयत्न केला. मराठी पाऊल पडते पुढे या चर्चासत्राला रसिकांनी भरभरून प्रतिसाद दिला.

## लक्षवेधी छायाचित्र....



निसर्ग – चित्र

(छाया : भीमराज सातदिवे, छ. संभाजीनगर )

# अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनात लेखक प्रकाशकांचा विशेष सन्मान

ज्योतिर्मय साहित्य

**नवी दिल्ली –** अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या दुसऱ्या दिवशी छत्रपती शिवाजी महाराज साहित्यनगरीत साहित्यासाठी दिलेल्या योगदानाबद्दल विशेष सन्मान समारंभ पार पडला. यावेळी सुप्रसिद्ध लेखिका आणि संशोधक संजीवनी खेर तसेच, मराठी प्रकाशन क्षेत्रात उल्लेखनीय योगदान देणाऱ्या डायमंड पब्लिकेशन्सचे श्री दत्तात्रय पाष्टे व श्रीमती कमल पाष्टे यांचा अखिल भारतीय मराठी महामंडळाच्या अध्यक्षा प्रा. उषा तांबे यांच्या हस्ते गौरव करण्यात आला.



श्रीमती संजीवनी खेर या ऐतिहासिक स्त्रियांच्या जीवनावर आधारित संशोधनपर आणि व्यक्तिचित्रणात्मक साहित्य लेखनासाठी प्रसिद्ध आहेत. त्यांची अनेक पुस्तके मराठी साहित्याच्या समृद्ध परंपरेत महत्त्वपूर्ण ठरली आहेत. पत्रकार, लेखिका आणि इतिहास अभ्यासक या तिन्ही क्षेत्रांत त्यांनी भरीव कार्य केले आहे. त्यांच्या योगदानाची दखल घेत अखिल भारतीय साहित्य महामंडळाच्या वतीने त्यांना विशेष सन्मान प्रदान करण्यात आला.

२००५ साली स्थापन झालेल्या डायमंड पब्लिकेशन्सने ९५० हून अधिक अभ्यासपूर्ण आणि माहितीपूर्ण पुस्तके प्रकाशित केली आहेत. मराठी साहित्याच्या वृद्धीसाठी आणि वाचकांना दर्जेदार साहित्य उपलब्ध करून देण्यासाठी या संस्थेचे योगदान उल्लेखनीय आहे. साहित्य क्षेत्रातील त्यांच्या या महत्वपूर्ण योगदानाबद्दल श्री दत्तात्रय पाष्टे व श्रीमती कमल पाष्टे यांचा सत्कार करण्यात आला. या विशेष सन्मान सोहळ्याला अनेक नामवंत साहित्यिक, संशोधक आणि वाचक मोठ्या संख्येने उपस्थित होते.



– विद्यावाचस्पती विद्यानंद
Mobile: +917709612655
Email: vidyavachaspati.vidyanand@gmail.com



## आनंदी पहाट...

## सामाजिक बांधिलकीचे भान आवश्यक


**ज्योतिर्मय साहित्य**

आजच्या गतिमान, आधुनिक आणि स्पर्धेच्या युगात अन्न, वस्त्र, निवारा ह्या किमान प्राथमिक गरजांचा विचार करून फक्त चालत नाही, तर बदलत चाललेल्या जीवनमुल्यांचाही स्विकार करावा लागतो. आज आपल्या आयुष्यातील प्रत्येक सुखात आणि दुःखात आपल्याला शारीरिकदृष्ट्या साथ-सोबत करणारे, मानसिक आधार देणारे, अंतर्मनाला धीर देणारे, आर्थिकदृष्ट्या सक्षमता देऊ करणारे, सामजिक पत निर्माण करणारे, शैक्षणिक प्रगतीची दिशा दाखवणारे, सामाजिक कौटुंबिक एकोपा टिकवणारे, आपली नातीगोती जपणारे, उणीवा दूर करणारे, आपल्या जाणीवा जपणारे, आपल्या जाणीवांना नेणीवेपर्यंत घेवून जाणारे, आपल्या जीवनात अत्यंत महत्वाची भूमिका बजावणारे आपले हक्काचे साधन हे दुसरे-तिसरे कोणतेही नसून ते म्हणजे आपल्या सामाजिक बांधिलकीचे नाते असते. आपल्या सर्वांच्या जीवनात अत्यंत महत्वाचा आणि जिव्हाळ्याचा विषय म्हणजे आपले सामाजिक स्थान. ह्या सामाजिक स्थानाचा संबंध थेट आपल्या सामाजिक बांधिलकीशी असतो. एक प्रकारे आपल्या बांधिलकीमुळे सामाजिक कुटुंबाचीच, नवीन नात्यांचीच निर्मिती होत असते. त्या दृष्टीकोनातून सामाजिक बांधिलकीचे महत्व सामाजिक कुटुंबासाठी समजून घेणे जरुरीचे असते.

आपले म्हणून ज्यावेळी आपण एखाद्या व्यक्तीचा अथवा गोष्टीचा मनापासून स्वीकार करतो तेव्हाच त्यांमधील आपला सहभाग वाढत जातो. तुझे-माझे करण्याच्या विचारांमुळे असणारा सहभाग केवळ माझ्या स्वत:शी संबंधित गोष्टींशीच राहतो. आपण सहजीवनाचा एकदा स्वीकार केला तरीही, आपण उगाचच असे करत राहतो. अनेकदा घडणाऱ्या काही घटना, घडामोडी ह्या निसर्गनियमांमुळे सुरु असल्यासारखे वाटते. कदाचित सहभागाचा अभाव असल्याचे ते महत्वाचे कारण असावे. सहभागाचा आनंद हा केवळ त्याची प्रचीती आल्याशिवाय देखील मिळत असतो. आपल्या भागाचे, वाट्याचे, नावचे, कर्तव्याचे भान ठेवून सहजीवनात सहभागी होणे महत्वाचे असते. आनंदप्राप्तीसाठी सकारात्मक वातारणाची निर्मिती करत राहणे गरजेचे असते.


## निवडक पण दर्जेदार गीते देणारा संगीतकार : खय्याम

**ज्योतिर्मय साहित्य**





चित्रपटगीतांचे दर्दी असणाऱ्या रसिकांना खय्याम हे नाव निश्चितपणे परिचित असणार. खय्याम यांची गीतं म्हणजे बावनकशी सोनं. हिणकस कुठेही आढळणार नाही. लतादीदींची संगीत कारकीर्द म्हणजे आकाशाचा एक विस्तीर्ण पट म्हटला तर निरनिराळ्या संगीतकारांची लखलखती नक्षत्रे आपल्याला या आकाशात चमकताना दिसतील. या नक्षत्रांमध्ये आपल्या तेजाने लक्ष वेधून घेणारे एक नक्षत्र म्हणजे संगीतकार खय्याम.

लतादीदींना एका मुलाखतीमध्ये गीतकार जावेद अख्तर यांनी विचारले की तुम्ही आजपर्यंत हजारो गाणी गायलीत. या सगळ्या गाण्यांमध्ये तुम्हाला सर्वात जवळचं वाटणारं गाणं कोणतं ? दीदी म्हणाल्या, तशी तर मला खूप गाणी आवडतात. पण मी जेव्हा एकटी असते किंवा प्रवासात असते तेव्हा रझिया सुलतान मधलं ऐ दिले नादान... हे गाणं गुणगुणायला मला खूप आवडतं. दीदींचं हे उत्तर ऐकून जावेद अख्तर खुश झाले कारण या गाण्याचे गीतकार होते जावेद अख्तर यांचे वडील जां निसार अख्तर आणि संगीतकार होते खय्याम. खय्याम म्हटलं की चित्रपट रसिकांसमोर त्यांचे नुरी, त्रिशूल, बाजार असे अनेक संगीतमय चित्रपट डोळ्यांसमोर फेर धरून नाचू लागतात. पण प्रामुख्याने डोळ्यापुढे येतात ते म्हणजे कभी कभी आणि उमराव जान. या दोन्ही चित्रपटातील गाणी म्हणजे खय्याम यांचे मास्टरपीस.



लता मंगेशकर आणि आशा भोसले या खैय्याम यांच्या अतिशय आवडत्या गायिका. एका ठिकाणी त्यांच्याबद्दल खैय्याम म्हणतात, या दोन्ही बहिणींबद्दल काय बोलावं ? एक संगीताची पट्टराणी तर दुसरी संगीताची महाराणी. काही वर्षांपूर्वी खय्याम यांना पं हृदयनाथ मंगेशकर पुरस्कार देण्यात आला तेव्हा ते म्हणाले, जगभरात खय्याम यांच्या नावाचा जो डंका वाजतो, ते नाव मोठे होण्यात लता मंगेशकर आणि आशा भोसले या दोन नावांचा मोठा वाटा आहे. लता मंगेशकर माझ्यापेक्षा वयाने लहान आहेत पण मी त्यांना माँ म्हणूनच हाक मारतो. देवानेच त्यांना मोठी पदवी देऊन पाठवले आहे. लतादीदींबद्दल यापेक्षा सुंदर आणि उदात्त उद्गार कोणते असू शकतील ! खय्याम यांची चित्रपट संगीताची कारकीर्द तशी साठ वर्षांची. पण एवढ्या प्रदीर्घ कालावधीत या माणसाने अवघे ५३/५४ चित्रपट केले असतील. त्यांनी आपल्या संगीताच्या दर्जाशी कधीही तडजोड केली नाही. जे द्यायचे ते सर्वोत्तमच द्यायचे हा त्यांचा बाणा होता. त्यामुळे या महान संगीतकाराच्या आयुष्यात काही काळ असा आला की दोन वेळच्या जेवणाची भ्रांत पडावी. त्यांच्या पत्नी म्हणजे प्रसिद्ध गायिका जगजीत कौर. जगजीत कौर या अत्यंत श्रीमंत अशा पंजाबी कुटुंबातून आलेल्या. त्यांच्या आणि खय्याम यांच्या संगीताच्या कार्यक्रमामुळे भेटी झाल्या. दोघांचे सूर जुळले आणि दोघे एकमेकांचे जीवनसाथी बनले. त्यांच्या विवाहाच्या आड त्यांचा धर्म, पैसा काही काही येऊ शकले नाही. जगजीत कौर आणि खय्याम म्हणजे जणू मेड फॉर इच ऑदर दोघांनी एकमेकांना सांभाळले, एकमेकांची प्रतिष्ठा जपली. २०१३ मध्ये खैय्याम यांच्या प्रदीप या मुलाचे अत्यंत दुःखद आणि अकाली निधन झाले. तो काळ या दोघांसाठी अतिशय वेदनादायी होता. पण जगजीत कौर यांनी प्रत्येक परिस्थितीत खैय्याम यांची साथ दिली. जगजीत कौर यांनी तुम अपना रंज ओ गम, अपनी परेशानी मुझे देदो हे शगुन चित्रपटातलं गाणं जणू खय्याम यांच्यासाठीच गायलं असं त्यांचं खैय्याम यांच्या प्रति असलेलं समर्पण आणि निष्ठा पाहून म्हणावसं वाटतं. **(क्रमश:)**



## दासबोध स्तवन



उज्वला धर्माधिकारी,
पुणे, मो. ७५८८२ ३५६४६

## भक्तिनिरुपण

**ज्योतिर्मय साहित्य**

अशी माणसे देवधर्म, जपताप, स्नानसंध्या, मंत्र, ध्यानधारणा हे काहिही करत नाही. भक्ती धर्म, पाहुणा रावळा, निष्ठा प्रेम, इतरांप्रती आदर हे कोणतेही गुण नसतात. सद्भक्ति, सद्भावना, सदाचार,, सद्बुद्धी, सारासार विचार, सद्गुण, हरिकथाश्रवण, अध्यात्म निरूपण यापैकी कोणताही गुण नसतो. भल्याची संगत नसते. चित्तर्वुती शुद्ध नसते. खोट्या गर्वामुळे अहंकारामु, मोक्षप्राप्ती नाही. न्याय, निती पुण्याचा अभाव, भलेबुरे काहीच कळत नाही. विद्या,वैभव,चातुर्याचा विकास,सरस्वतीचा वाड:विलास, भाषेवर प्रभुत्व नसणे, तर अशा माणसाच्या ठायी क्षमा, शांती, दया, दिक्षा घेतलेले एखादे नियमधर्म, मैत्री,शुभ आशुभांचा अभाव हे कोणतेही गुण नाहीत. फक्त आणि फक्त स्वैराचार स्वछंदता असते. पवित्र,स्वधर्माचारण, सदाचार ईहलोक, परलोक याबद्दल कोणताही विचार नसतो.


अशा या भक्तिमार्गाच्या शेवटा कडे येताना मला असे म्हणावेसे वाटते की कर्म ऊपासना, ज्ञान, वैराग्य, योग,धारिष्ट या सगळ्या गोष्टींचा अभाव माणसात असतोतर अशा अधर्माने वागणारे,ज्याला दुसऱ्याचे चांगले पहावत नाही परोपकार केल्याने मिळणारे सुख अनुभवत नाही अशी अपवित्र माणसे त्यांचि सहवास टाळावा. त्यांच्या नादी लागू नये.

जैसे ज्याचे कर्म तैसे फळ देतो रे ईश्वर. यावर विश्वास ठेवावा.

श्री राम जय राम जय जय राम
जय जय रघूवीर समर्थ।

**(क्रमश:)**

## नाम व विकल्प



### श्री ब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराज

**ज्योतिर्मय साहित्य**

नाम घेऊ लागले की विकल्प उठतात आणि ते घेण्याबद्दलची निष्ठा कमी होते, याला काय करावे ? अशी तक्रार आपण सर्वसाधारणपणे करतो; पण असे होण्यातच नामाचे महत्त्व प्रस्थापित होते हे आपल्या लक्षात येत नाही. मनुष्य नाम घेऊ लागला की विकल्पांना असह्य होते, आणि आता हा नाम घेऊ लागला, आता आपली धडगत नाही अशा धास्तीने त्यांची चळवळ चालू होते, आणि मनुष्याला नामापासून परावृत्त करण्याचा ते प्रयत्न करतात. विकल्प हे अती सूक्ष्म आहेत. त्यांचे उच्चाटन करायला त्यांच्यापर्यंत पोहोचणारा आणि तितकाच सूक्ष्म असा उपाय पाहिजे. तो उपाय म्हणजे भगवंताचे नाम. एखाद्या बिळात सर्प शिरला तर त्याला बाहेर काढण्याकरिता त्याच्यापर्यंत पोहोचून त्याला तिथे राहणे असह्य करील असाच उपाय करणे जरूर असते. बाहेरून कितीही आरडाओरडा केला तरी त्याचा उपयोग होत नाही. बिळात धूर किंवा गरम पाणी सोडले की तो बाहेर येतो. त्याप्रमाणे नाम घेतले की विकल्प उठतात, म्हणजे विकल्पांच्या मूळ ठिकाणापर्यंत नामाची आच जाऊन पोचली असे ठरते. तर मग नाम घेऊ लागल्यावर विकल्प येऊ लागले तर गांगरून न जाता, हे सुचिन्ह आहे असे समजून विकल्पांच्या उच्चाटनाची गुरूकिल्ली मिळाली अशा जाणिवेने, जास्त आस्थेने नाम घेण्याचा निश्चय करावा हाच त्याला उपाय. नामाबद्दल सुरूवातीला सर्वांचीच वृत्ती साशंक असते, पण आपण सतत नाम घेत गेल्यानेच विकल्प कमी होतात. कोणतीही गोष्ट अभ्यासानेच साध्य होत असते. आज खरी भक्ती नाही म्हणून भगवंताचे स्मरण नाही; आणि भगवंताचे स्मरण ठेवण्याचा अभ्यास केल्याशिवाय खरी भक्ती येत नाही. शहाण्या माणसाने उगीच विकल्प न लढविता भगवंताचे स्मरण ठेवायला आरंभ करावा. विकल्प जाऊन भगवंताचे संकल्प उठू लागले की आपले काम झाले.

आपण रस्त्याने चाललो की नको ती माणसे भेटायचीच; पण आपण आपले नाम चालू ठेवावे. तसे, विकल्प आले तर नाम सोडू नये. पण गंमत अशी होते की, वाईट मनुष्य भेटला आणि आपण त्याच्याकडे लक्ष द्यायचे नाही असे म्हटले तरी, तो मुद्दाम खाकरतो आणि आपले लक्ष वेधतो. अशा वेळी त्याच्याकडे पाहूनही आपण दुर्लक्ष करतो. त्याचप्रमाणे विकल्पांनी आपले लक्ष ओढून घेतले तर नावडीने लक्ष द्यावे पण आपले नाम सोडू नये. शंका घ्यायचीच झाली तर नाम चालू ठेवून घ्या, म्हणजे ते नामच शंकांचे निरसन करील आणि विकल्पांनाही हळूहळू पायबंद घालील. पुष्कळ केलेले शंकेने व्यर्थ जाते. आपण नाम सोडणार नाही हे नक्की ठरविले की आपली वृत्ती नि:शंक होतेच होते.






विभावरी कुलकर्णी,
मो. ८०८७८१०१९७

## सहज सोपे

**ज्योतिर्मय साहित्य**

परवा एक गंमतच झाली. माझ्या मैत्रिणीने आवर्जून एका कार्यक्रमाला बोलावले. कार्यक्रम होता अभिवाचनचा ! मी पण काही मैत्रिणी घेऊन मोठ्या उत्साहाने गेले. तिने बोलावलेले असल्याने अगदी पुढच्या खुर्चीवर बसायला जागा मिळाली. सगळे जण अगदी उत्तम वाचन करत होते. पण मला त्यातील काहीच उमजेना. मग हळूहळू झोप येऊ लागली. कसेबसे ते सगळे ऐकले. कार्यक्रम झाल्यावर मैत्रिणीने विचारले, ‘‘कार्यक्रम आवडला का ?‘‘ मी खूप छान झाला असे सांगितले. त्यावर ती जे उत्तरली ते ऐकून पुरतीच झोप उडाली. ती म्हणाली, ‘‘चांगली झोपली होतीस की!‘‘ मी म्हटले की डोळे मिटल्यामुळे तुम्ही वाचता ते दृश्य डोळ्यासमोर आले. असे काहीतरी सांगून वेळ मारून नेली.

पण तो प्रसंग काही डोक्यातून जात नव्हता. नंतर लक्षात आले, बहुतेक कथा विषय अवघड, बोजड शब्दात असल्याने असे झाले. मग मन एकदम मागे गेले.

‘‘सहज सोपे ‘‘ हा शब्द नेहेमी ऐकण्यात असतो. पण त्याचा अर्थ कळायला योग्य वेळ यावी लागते असे वाटते. म्हणजे माझा तरी अनुभव तसा आहे. . चे ट्रेनिंग घेऊन मी नवीनच प्राथमिक शिक्षिका म्हणून रुजू झाले होते. त्या वेळचा अनुभव चांगलाच लक्षात आहे. मला आमच्या हेडसरांनी परिपाठाच्या वेळी अचानक गोष्ट सांगायला सांगितले. मी पण ऐटीत गोष्ट सांगायला लागले. कारण गोष्टी तर खूप माहिती होत्या. लहानपणी पासून वाचन खूप होते. त्या आधारावर मी उभी राहिले. अगदी फार तात्विक गोष्ट सांगितली. त्यात गाण्यांच्या ओळी, काही संवाद म्हणून दाखवले. मला वाटले, माझी गोष्ट सगळ्यांना आवडली. कारण वेगळी आणि माहितीपूर्ण गोष्ट होती ना ! सगळ्यांनी टाळ्या तर वाजवल्या. पण माझ्या लक्षात आले, गोष्ट चांगली होती पण माझ्या सांगण्यात काहीतरी गडबड झाली होती. वर्गातही तसेच व्हायचे. मी सांगितलेली गोष्ट मुले उत्सुकतेने ऐकायची पण.... हा पण काही लक्षात येत नव्हता. असेच काही दिवस गेले. पण कथेचे आणि माझ्या कथनाचे काही जमत नव्हते.

त्याच वेळी थोडे शेजारच्या वर्गात डोकावले तर मुलांच्या चेहेऱ्यावर विविध भाव दिसायचे. मग त्याच माझ्या ज्येष्ठ सहकारी भगिनीला शरण गेले. आणि तिच्या कथन कौशल्याचे व मुलांच्या चेहेऱ्यावर दिसणाऱ्या भावनांचे गुपित विचारले. तिला म्हटले, ‘‘ जरा समजावून सांग ना की गोष्ट कशी सांगू म्हणजे मुलांना समजेल ? ‘‘ त्यांनी पण मला जवळ बसवून घेतले. आणि म्हणाल्या, तुझ्या गोष्टी खूप छान असतात. पण सांगण्याची पद्धत जरा कठीण आहे. कठीण सादरीकरण फार काळ कोणाच्या पचनी पडत नाही. त्या साठी साधी, सोपी भाषा वापरावी. तरच अवधान टिकून रहाते. मग पुढचे काही दिवस मी त्यांच्याकडे जणू क्लासच लावला. मला जी गोष्ट सांगायची असायची ती मी त्यांना सांगायची आणि त्या मला ती गोष्ट सोप्या शब्दात कशी सांगायची याचे प्रात्यक्षिक करून दाखवायच्या. असे शिकवण्याचा भाग पण कसा सोपा करुन शिकवावा हे पण त्यांनी सांगितले. आणि त्यानंतर माझी अवजड, बोजड भाषा जाणीवपूर्वक बदलली. ती आजपर्यंत. त्या माझ्या सहकारी भगिनीला मनापासून धन्यवाद ! त्या भगिनीचे नाव आहे, सौ. अलका कुलकर्णी.

अशा खूप चांगल्या मैत्रिणी आयुष्यात लाभल्या. आणि त्यांनी खूप चांगल्या आयुष्यभर लक्षात राहतील अशा आठवणी दिल्या आहेत.



## नीतिशतक निरूपण

अनुवाद आणि निरूपण
ह.भ.प.चंद्रहास शास्त्री सोनपेठकर

**ज्योतिर्मय साहित्य**

असन्तो नाभ्यर्थ्याः सुहृदपि न याच्यः कृशधनः
प्रिया न्याय्या वृत्तिर्मलिनमसुभङ्गेऽप्यसुकरम् ।
विपद्युच्चैः स्थेयं पदमनुविधेयं च महतां
सतां केनोद्दिष्टं विषममसिधाराव्रतमिदम् ।।

अर्थ – सज्जन लोक दुर्जनांकडे याचना करू शकत नाहीत. ज्याच्याकडे अल्पधन आहे, अशा मित्राकडेही मागू शकत नाहीत. प्रिय आणि न्यायपूर्ण आजीविकेनेच काम चालवायचे आहे. प्राणांतीही अनुचित कर्म करू शकत नाहीत. विपत्तीतही स्वाभिमानाने रहावे लागते. श्रेष्ठ जनांच्या मार्गाचे अनुसरण करून व्यवहार करावा लागतो. अशा तलवारीच्या पात्यावर चालण्याप्रमाणे कठिण व्रताचा उपदेश सज्जनांना कोणी केला असेल बरे?

सज्जनांचा जगण्याचा मार्ग म्हणजे तलवारीच्या पात्यावर चालण्यासारखा असतो. याचना न करता, कोणासही न फसविता, स्वाभिमानाचे संरक्षण करीत, श्रेष्ठ जनांच्या मार्गाचे अनुसरण करीत करीत ते आपला व्यवहार पार पाडीत असतात.




## हळदीच्या सेवनाने झपाट्याने कमी होईल खराब कोलेस्ट्रॉल?

**ज्योतिर्मय साहित्य**

प्राचीन काळापासून हळदीचा वापर आरोग्यासाठी केला जातो. कोलेस्ट्रॉलच्या समस्येवरही हळद उपयुक्त ठरू शकते. फक्त वापरण्याची पद्धत एकदा जाणून घ्या

हळद आपल्याला प्रत्येक घरामध्ये पाहायला मिळते. हळदीचा वापर सामान्यतः घरांमध्ये जेवण चवदार बनवण्यासाठी केला जातो. त्वचेचे सौंदर्य वाढवण्यापासून ते रोगप्रतिकारक शक्ती वाढवण्यासाठी हळद खूप फायदेशीर आहे. हळदीचा वापर प्राचीन काळापासून संसर्ग, जखम आणि पोटाच्या समस्यांसाठी केला जातो. हळद हा अनेक पोषक तत्वांनी समृद्ध आहे जी कर्करोग आणि मधुमेह यांसारख्या रोगांवर उपचार करण्यास मदत करते. हळदीचे आरोग्यदायी फायदे बाजारात सहज उपलब्ध आहेत आणि ती विविध प्रकारे वापरली जाऊ शकते. हळद रक्तातील कोलेस्टेरॉल नियंत्रित ठेवून हृदय निरोगी ठेवण्यास देखील मदत करू शकते. चला जाणून घेऊया हळदीचे सेवन कोलेस्टेरॉल नियंत्रित करण्यासाठी कसे उपयुक्त ठरते?

‘‘हृदयविकारात फायदेशीर‘‘

शरीरात उच्च कोलेस्ट्रॉल म्हणजे तुम्हाला हृदयविकाराच्या झटक्यापासून स्ट्रोकपर्यंत कोणत्याही गोष्टीचा धोका असू शकतो. अशा परिस्थितीत हळदीसोबत कोलेस्टेरॉलची पातळी राखण्यासाठी वेळोवेळी अनेक अभ्यास आणि संशोधन केले गेले आहेत. प्राणी आणि मानवांवर केलेल्या संशोधनानुसार हळदीचे सेवन केल्याने रक्तातील कोलेस्टेरॉलच्या पातळीवर तीन प्रकारे परिणाम होतो.

१) कोलेस्टेरॉलची पातळी कमी करणे...

लो-डेन्सिटी लिपोप्रोटीन म्हणजेच कोलेस्टेरॉलला वाईट कोलेस्ट्रॉल म्हणतात आणि त्यामुळे हृदयाच्या गंभीर समस्या उद्भवू शकतात. हळदीचे सेवन केल्याने एलडीएल कोलेस्ट्रॉलची पातळी कमी होते आणि शरीरातील चांगल्या कोलेस्ट्रॉलची पातळी वाढते, ज्यामुळे आरोग्य सुधारण्यास मदत होते.

२) ऑक्सिडेशनपासून एलडीएल कोलेस्टेरॉलचे संरक्षण

एथेरोस्क्लेरोसिस तेव्हा होतो जेव्हा एलडीएल कोलेस्टेरॉल ऑक्सिजनसह प्रतिक्रिया देते, ज्यामुळे रक्ताभिसरणात अडथळा येऊ शकतो. हळदीचे सेवन केल्याने हे ऑक्सिडेशन थांबते, त्यामुळे कोलेस्ट्रॉल नियंत्रित राहते आणि रक्तवाहिन्याही निरोगी राहतात.

३) ट्रायग्लिसराइड पातळी कमी करणे

उच्च रक्तातील कोलेस्टेरॉलसह उच्च ट्रायग्लिसराइड पातळी हृदयाच्या आरोग्यास धोका निर्माण करू शकते. ट्रायग्लिसराइड देखील धमन्यांमध्ये तयार होते, ज्यामुळे कोलेस्टेरॉल रक्ताभिसरण समस्या निर्माण करणे सोपे होते. हळदीच्या वापराने ट्रायग्लिसराइडचे प्रमाण नियंत्रित करता येते.

हळदीमध्ये अँटीबॅक्टेरियल गुणधर्म असतात. खराब कोलेस्टेरॉल कमी करण्यासाठी रोज भाज्यांमध्ये हळदीचा वापर करावा. तसेच रात्री झोपण्यापूर्वी एक ग्लास दुधात चिमूटभर हळद टाकून प्यावे. याशिवाय रोज एक कप ग्रीन टी प्यायल्याने उच्च कोलेस्ट्रॉलची पातळी कमी होण्यास मदत होते.

**



संकलन –
डॉ. प्रमोद ढेरे (निसर्ग उपचार तज्ञ)
पिंपरी-चिंचवड, पुणे.
आरोग्यविषयक व्याख्याते व लेखक
संपर्क – ९२ ७१ ६६९ ६६९


## आचरणात आणावे असे




**ज्योतिर्मय साहित्य**

वेळ दिसत नाही पण खूप काही दाखवते आपलेपणा सर्वच दाखवितात पणआपल कोण आहे ते वेळच दाखवते. म्हणून जीवनात एवढे व्यस्त रहा की पश्चाताप, दुःख, भिती आणि कोणाचा द्वेश करायला वेळच मिळायला नको, कारण दुःखी तीच व्यक्ती असते जी रिकामी असते त्यामुळे उत्तर असूनही प्रत्येक वेळी प्रत्येक प्रश्नाचे उत्तर देता येत नाही. काही उत्तर स्वतःच्या तर काही इतरांच्या हितासाठी टाळावी लागतात. कोणाचे उपकार कितीही लहान असले तरी ते कधीही विसरू नका आणि तुमचे उपकार कितीही मोठे असले तरी ते कधीही दाखवू नका. जो स्वतः सोबत दुसऱ्यांचाही विचार करतो त्यालाच माणूसकीचा खरा अर्थ कळतो म्हणून संयम राखणे हा आयुष्यातला फार मोठा गुण आहे, कारण एक चांगला विचार अनेक वाईट विचारांना नाहीसा करतो हवेची पण गंमत असते ना, चाकातून गेली की , चाक पळत नाही. डोक्यात गेली की, चांगल-वाईट कळत नाही. आणि श्वासोश्वास सोडून गेली की, घरात कोणी ठेवत नाही. म्हणून आपली सावली निर्माण करायची असेल तर ऊन झेलण्याची तयारी असावी लागते असामान्य माणसाची तीन लक्षणे असतात. तो चुकीचे काम करत नसल्याने त्याला चिंता नसते, त्याच्याकडे ठाम ‘‘विचार‘‘ असल्याने त्याच्या मनात गोंधळ नसतो आणि तो प्रामाणिक असल्याने त्याला कशाचीही पर्वा, भीती, नसते म्हणून वेळ ही नदीसारखी आहे, आपण एकाच पाण्याला दोनदा स्पर्श करू शकत नाही. कारण एकदा निघून गेलेला पाण्याचा प्रवाह, पुन्हा परत येत नाही. वेळेला महत्व देऊन आयुष्याच्या प्रत्येक क्षणाचा आनंद घ्या ! यासाठी सगळेच निर्णय मनाने घेऊ नका काही निर्णय, बुद्धीलाही घेऊ द्या

## रवींद्रनाथ टागोर





विश्वास देशपांडे,
चाळीसगाव
मो. ९४०३७४९९३२

### रवींद्रनाथ टागोर : वारसा आणि कार्य

**ज्योतिर्मय साहित्य**

मी आयुष्यभर शिक्षक म्हणून काम केलं. पण रवींद्रनाथांचे शिक्षणविषयक विचार मला आजही अंतर्मुख करून जातात आपले डोळे आणि कान उघडे असतील,तर माणूस आयुष्यभर शिकतच असतो. आणि असंच आपण शिकलं पाहिजे असं रवींद्रनाथांना वाटायचं. एकदा शांतिनिकेतनात आलेली मुलं आपलं शिक्षण पूर्ण करून शांतिनिकेतनच्या बाहेर पडली तरी मनानं त्यांनी तेथेच असावं. आयुष्यभर विद्यार्थीच राहावं आणि नवनवीन गोष्टी आत्मसात करीत राहाव्यात असं त्यांना वाटायचं. लहान मुलांपासून ते विश्वविद्यालयात शिक्षण घेणारी सर्व प्रकारची मुले त्यांच्या शांतिनिकेतन आणि विश्वभारतीत होती. मुलांनी शिक्षण घेता घेता त्यांचे आपापसातील भेद मावळावेत, आपण सर्व एक आहोत अशा प्रकारची बंधुत्वाची जाणीव त्यांच्यात निर्माण व्हावी अशी त्यांची मनापासूनची इच्छा होती. संत ज्ञानेश्वरांनी म्हटल्याप्रमाणे

हे विश्वची माझे घर, ऐसी मती जयाची स्थिर ।
किंबहुना चराचर आपणचि जाला ।।

अशीच त्यांचीही भावना होती. त्यासाठीच विश्वभारतीची स्थापना त्यांनी केली होती. पण आपण आपल्या कार्यात फारसे यशस्वी ठरलो नाही अशा प्रकारची खंतही त्यांनी एका ठिकाणी व्यक्त केली आहे. त्याचे प्रमुख कारण त्यांनी फार सुंदर सांगितले आहे. ते म्हणतात, आम्ही सगळे ग्रंथोपजीवी झालो आहोत. ग्रंथांच्या किंवा ग्रांथिक ज्ञानाच्या पलीकडे आम्ही काही पाहायलाच तयार नाही. जिथे शरीर आणि मन एकत्र येत नाही असे शिक्षण माणसाला अपूर्ण ठेवते. शारीरिक श्रम आणि बौद्धिक श्रम अशी वेगवेगळी शिक्षणाची वर्गवारी त्यांना मान्यच नव्हती.

सहजता हा रवींद्रनाथांच्या शिक्षणाचा प्राण होता. शिक्षण हसत खेळत, नाचत गात गात सहजतेनं व्हावं असं त्यांना वाटत होतं. त्यांनी स्वतः मुलांसाठी जी पाठ्यपुस्तकं तयार केली, त्यात कमालीची सहजता आहे. त्या पुस्तकांना सहजपाठ असेच म्हटले आहे. शाळेत येताना किंवा शाळेतून जाताना मित्र मित्र एकत्र जमून जातात. ते आपसात कसे बोलत असतील, त्यांच्या आनंदाच्या कोणत्या कल्पना असतील हे केंद्रस्थानी ठेवून त्यांनी पुस्तकांची रचना केली. त्यामुळे मुलं जेव्हा ही पुस्तकं वाचत तेव्हा त्यांना आपण वेगळं काही वाचतो आहोत किंवा अभ्यास करतो आहोत असं वाटतच नसे. त्या पुस्तकांमध्ये धडे होते पण मुलांना मुद्दामहून धडे द्यायचा प्रयत्न त्यांनी केला नव्हता. वसंत बापट यांच्या कवितेत म्हटल्याप्रमाणे

देह मंदिर चित्त मंदिर एक तेथे प्रार्थना
सत्य सुंदर मंगलाची नित्य हो आराधना.

अशीच सत्य, सुंदर आणि मंगलाची नित्य आराधना शांतीनिकेतन मध्ये केली जात होती.

त्यांनी तयार केलेली पुस्तकं प. बंगालमध्ये मुलं, पालक आणि शिक्षक आजही आनंदानं वापरतात. प. बंगालमध्ये मध्यंतरी मार्क्सवादी सरकार आलं. त्यांनी ही पाठ्यपुस्तकं बदलण्याचा प्रयत्न केला पण जनतेचा त्याला प्रचंड विरोध झाला. म्हणून आजही ही पुस्तकं अनौपचारिकरीत्या मुलांना सहज शिक्षण देण्याचं कार्य करतात.

असं जॉन किट्स या कवीनं म्हटलं आहे. रवींद्रनाथांच्या पाठ्यपुस्तकांना, त्यांच्या शिक्षणविषयक विचारांना हे वाक्य तंतोतंत लागू पडतं. कारण चांगल्या गोष्टी, चांगली मूल्ये कालातीत असतात. ती कधीही कालबाह्य होत नाहीत. शिक्षणाला कोणत्याही चौकटीत बसवू नका. मुलांना मुक्तपणे वावरू द्या, त्यांच्या व्यक्तिमत्वाचा विकास होऊ द्या . त्यांची बुद्धी आणि हात यांना एकत्र काम करू द्या. शिक्षण म्हणजे मनाविरुद्ध, जबरदस्तीने करण्याची गोष्ट आहे असे त्यांना वाटता कामा नये. आनंदातून शिक्षण आणि शिक्षणातून आनंदनिर्मिती व्हावी असं त्यांना वाटे. **(क्रमशः)**

# लोकसाहित्याचा मागोवा....

**ज्योतिर्मय साहित्य**

**प्राचीन काळापासून भारतीय पारंपरिक लोककलांचे विश्व समृद्ध आणि संपन्न आहे. विविधतेतील एकता हे पारंपरिक लोककलांचे आगळे-वेगळे वैशिष्ट्य आहे. मौखिक परंपरा हे भारतीय लोककला आविष्काराचे वेगळेपण होय. हा वारसा एका पिढीने दुसऱ्या पिढीच्या हाती सुपूर्द केला आहे. त्यामुळे या लोकाविष्काराचे आकलन करताना त्यातील सूक्ष्म बारकावे लक्षात घेतले असता काही नवे प्रवाह गोचर होतात. पारंपरिक लोककलांचे जनसंवाद हे सामर्थ्य हे अतिशय लक्षणीय स्वरुपाचे आहे. परंतु, ते उपेक्षित आणि दुर्लक्षित राहिले आहे. पारंपरिक लोककलांचे आणि त्यांच्या आविष्काराचे दृढ नाते हे कलावंतांच्या जीवनाशी निगडीत आहे. देशाच्या, राष्ट्राच्या उन्नतीचेही ते एक प्रमुख साधन आहे.**

लोक हा बहुवचनी शब्द आहे. लोकांचे आपोआप घडत गेलेले जीवन, त्यांनी निर्माण केलेला परिसर, त्या अनुभवांची गाणी, गोष्टी, म्हणी, उखाणे, चाली-रिती, श्रद्धा-समजुती, देवदेवता, कला, क्रीडा म्हणजे लोकसाहित्य! समूहमनाचा स्वीकार किंवा नकार, समूह मनाने केलेले बदल, बरे-वाईट प्रत्येक युगातच घडत असतात. 'लोक' ते स्वीकारीत-नाकारित असतात आणि भाषेतून व्यक्तही करीत असतात. म्हणून लोकसाहित्य सतत घडत-बि-घडत असते, ते केवळ ग्रामीण किंवा भूतकालीन नसते. समाजाच्या विविध स्तरातले लोकमन सामूहिक अबोधपणे ते घडवित आणि मोडीत असते. ते प्रवाही आणि कालप्रवाही असते.

**शिक्षितांकडूनच दुर्लक्ष!**

मी येथे समग्र लोकसाहित्याबद्दल गंभीर चिकित्सा करीत बसणार नाही. आपल्या डोक्याला मुद्दामहून, अगदी जरासा ताण देण्याचाही माझा यत्किंचितही हेतू नाही. तर लोकमन कालप्रवाहात कोणते लोकसंचित कसे स्वीकारीत जाते, त्याला कशी वळणे मिळतात, गाभा परंपरेतला राहूनही बदल-परिवर्तन कसे होत जाते, यांच्या काही उदाहरणांसह मागोवा घेण्याचा हा एक छोटेखानी माझा प्रयत्न आहे.

इंग्रजोत्तर नागरी शिक्षित समूहातून तमाशासारख्या लोककलांकडे दुर्लक्ष झाले. त्याची जागा 'नाटक' या कलाप्रकाराने घेतली. मराठी नाटक हे इंग्रजोत्तर शिक्षित मंडळींनी इंग्रजी नाटकांच्या अनुकरणातूनच उचलले, कारण आज आपण ज्याला नाटक म्हणतो ते शाळा-महाविद्यालयांत शिकणाऱ्यांसाठी तेव्हा उपलब्धच नव्हते. तेथे प्रथम इंग्रजीतून शेक्सपिअरची आणि पुढे अन्य पाश्चिमात्य नाटककारांचीच नाटके शिकविली गेली. स्नेहसंमेलनात त्यांचेच प्रयोग होवू लागले, तेच आम्ही उत्साहाने पाहत आलो. सांस्कृतिक भूक भागवत गेलो.

**लोककला आवाहक ताकद!**

संस्कृत नाटकेही शिकविली गेली. मग इंग्रजी आणि संस्कृत नाटकांची भाषांतरे, रुपांतरे होवू लागली. मग त्या पद्धतीच्या अनुकरणातून मराठी नाटके लिहिली गेली. पण, नाटकाचा खरा प्राण त्याचा 'प्रयोग' असतो. प्रारंभीचा हा भाषांतरित नाटकांचा एक जोरकस प्रवाह आला आणि काही काळ बराच स्थिरावला. १९२५ मध्ये एका नाटककाराला एकदम आपल्या पारंपरिक लोककलांचा बाज एका नागर नाटकात आणावासा वाटला. माधवराव जोशी यांचे 'संगीत संस्थानिक स्वराज्य अथवा म्युनिसिपालिटी' हे ते नाटक होय! नुकत्याच स्थानिक स्वराज्य संस्था उदयास आल्या होत्या. त्या म्युनिसिपालिटीची निवडणूक हा नाटकाचा विषय. धमाल विडंबन आहे हे. आजही कोणी प्रयोग केला तर आजच्याच नगरपालिकांचे हुबेहूब चित्र त्यात आहे असे वाटते.



स्वातंत्र्योत्तर काळात पुन्हा एकदा देशीपणाची अस्मिता जागी झाली. लोकसाहित्य, लोककलांचा पुन्हा वापर केला गेला. मात्र, नाटकात पुन्हा लोककलांचा उपयोग झाला, तो जर्मन नाटककार बर्टोल्ड ब्रेख्त यांच्या अनुकरणाने. समाजामध्ये सामाजिक, राजकीय परिवर्तन करायचे असेल तर लोककलांमधील सामूहिक आवाहक आणि आश्वासक ताकदीचा प्रयोग आणि उपयोग करून घेणे प्रभावी ठरते. डाव्या विचाराच्या ब्रेख्तने श्रमकऱ्यांच्या, कष्टकऱ्यांच्या न्यायाचे प्रश्न मांडण्यासाठी केलेल्या प्रयोगापैकी 'कॉकेशियन ऑफ चॉक सर्कल' या 'अजब न्याय वर्तुळाचा' (अनु. चिं. त्र्यं. खानोलकर) या अनुवादित नाटकाने मराठी रंगभूमीला एक दिशा दाखविली. सर्वसामान्य लोकांना परिचित अशी एखादी लोककथा लोककलांच्या माध्यमातून मांडायची. ते लोकांना परिचित असते, आवडते. मग त्याच परिचित कथेतून नवा, कालसंवादी आशय, विषय मांडून परंपरेला कलाटणी देवून नव्या काळाशी संवाद साधायचा. ब्रेख्तच्या या तंत्रातून १९७०-८० च्या दशकात काही भाषांतरित, रुपांतरित नाटके झाली. श्रमकऱ्यांचे, कष्टकऱ्यांचे भीषण महानगरी वास्तव मांडणारे रत्नाकर मतकरींचे 'लोककथा ७८' हे नाटक आले. पुण्याच्या सतीश आळेकर आणि जब्बार पटेल यांनी विजय तेंडूलकरांचे 'घाशीराम कोतवाल' हे नाटक मराठी रंगमंचावर आणून इतिहास घडविला. हे नाटक आशय आणि प्रयोग दोन्ही दृष्टींनी युगप्रवर्तक ठरले. वर-वर पाहता कथा ऐतिहासिक, सादरीकरणासाठी दशावतार, भारूड, गोंधळ अशा लोककला प्रकारांचा वापर आणि आशय कालातीत. प्रत्येक वेळी नाटक नवेच वाटावे.



डॉ. शेषराव पठाडे,
छत्रपती संभाजीनगर.
मो. ९६०४८८४०५६

याच प्रवाहात मग सतीश आळेकरांचेच 'महानिर्वाण' नाटक आले. एकूण मानवी जगण्या-मरणातील विसंगतीवरची ही उपहासिका 'ब्लॅक कॉमेडी' म्हणता येईल, अशी आविष्कारासाठी प्रामुख्याने वापरली. कीर्तन शैली म्हणजे एक लोककलाच ! **(क्रमशः)**

# साहित्य नगरीतील ग्रंथनगरीत वाचकांची झुंबड

**ज्योतिर्मय साहित्य**

**नवी दिल्ली** – येथील तालकटोरा स्टेडियममधील छत्रपती शिवाजी महाराज साहित्य नगरीत होत असलेल्या ९८ वे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनानिमित्त उभारण्यात आलेल्या तर्कतीर्थ लक्ष्मण शास्त्री जोशी ग्रंथनगरीतील नामांकित प्रकाशन संस्थांच्या दालनांना साहित्यप्रेमी मोठ्या संख्येने भेट देत आहेत.

अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनात देशभरातील विविध नामांकित प्रकाशनाच्या दालनांना साहित्य रसिक भेट देत आहेत. महाराष्ट्रसह देशातील विविध राज्यातून आलेले साहित्यप्रेमी दालनांना भेट दिल्यानंतर पुस्तके चाळताना दिसत आहेत. बार्टी, बालभारती, लोकराज्य यासह शासनाच्या विविध प्रकाशनाच दालनांवरही साहित्य रसिकांची गर्दी होती. या नगरीत शंभरहून अधिक दालने आहेत.




यंदाच्या संमेलनात संदेश भंडारे यांच्या छायाचित्रांनी साकारलेल्या ''तमाशा आणि वारी'' या विशेष स्टॉलने रसिकांचे लक्ष वेधून घेतले आहे. महाराष्ट्राच्या समृद्ध लोकपरंपरेतील दोन महत्त्वाचे सांस्कृतिक प्रवाह पंढरीची वारी आणि तमाशा यांचे अप्रतिम छायाचित्र संकलन येथे प्रदर्शित करण्यात आले आहे.

# सोंग आणि पुढचं सोंग – वाचकांसाठी सज्ज

**ज्योतिर्मय साहित्य**

आयुष्यात प्रत्येकानेच कधी ना कधी प्रेम केलेलं असतं. कधी तिचं नाव कागदावर लिहून त्या कागदाची पप्पी घेतलेली असते, तर कधी स्लोमोशनमध्ये धावत जाऊन तिला कडेवरही घेतलेलं असतं. प्रत्येकाने स्वत:मध्ये एका हिरोला शोधलेलं असतं. कधी तुम्ही शाहरुख असता आणि ती काजोल, तर कधी तुम्ही गोविंदा आणि ती करिष्मा. स्वप्नातही तिच असते, रानातही डोळे तिलाच शोधत असतात आणि गावभर फिरता तुम्ही जाता फक्त तिच्यासाठीच.

सोंग कादंबरीतल्या संज्यानेही असंच बेभान प्रेम केलं होतं. तो हसायचा फक्त तिच्यासाठी. झोपेतून उठायचा फक्त तिच्यासाठी आणि शाळेतही जायचा तिच्यासाठी. याच संज्याने साडी नेसायचं ठरवलं तेही फक्त तिच्यासाठी.

तिने आपल्याकडं पहावं म्हणून. तिने आपल्याकडं पाहून हसावं म्हणून आणि आपल्यालाही तिच्याकडं पाहता यावं म्हणून संज्यासारख्या धडधाकट पोरानं साडी नेसली खरी, पण ती साडी कायमचीच त्याच्या अंगाला चिकटून राहील, असं त्याला स्वप्नातही वाटलं नव्हतं.


संज्याच्या निर्मळ प्रेमाची खिल्ली उडविणाऱ्या या दुनियेनं संज्याला अशा फेऱ्यात अडकवलं की संज्यानं हिजडा होणंच पसंद केलं. पण, पुढे काय? संज्या आयुष्यभर तसाच राहतो का ? त्याचं प्रेम पूर्ण होतं का ? आपल्यावर जो मुलगा प्रेम करतो त्याला आयुष्यभर साडीत बघणं कोणती मुलगी स्वीकारेल?

अशा हजारो टणक प्रश्नांची तेवढीच खणखणीत उत्तरे म्हणजेच सोंग आणि पुढचं सोंग या कादंबऱ्या.

सोंग हा या गोष्टीचा पहिला भाग आहे, तर पुढचं सोंग हा दुसरा भाग. तुम्ही आधी पहिला भाग मागवू शकता व त्यानंतर दुसरा मागवू शकता किंवा दोन्हीही भाग एकाचवेळी मागवू शकता. आपल्या रायटर प्रकाशनने या दोन्ही कादंबऱ्या प्रकाशित केल्या असून सोमवार दिनांक ३ फेब्रुवारीपासून घरपोच पाठविल्या जातील.

सोंग – किंमत ३०० रूपये – सवलतीचा दर – २७० रुपयांत घरपोच – पाने २२४

पुढचं सोंग – किंमत ३०० रूपये – सवलतीचा दर – २७० रुपयांत घरपोच – पाने २३२





सोंग आणि पुढचं सोंग दोन्ही कादंबऱ्या एकाचवेळी मागविल्या तर ५०० रूपयांत घरपोच.

लेखक – नितीन अरूण थोरात
प्रकाशक – रायटर प्रकाशन
कादंबरी मागविण्यासाठी – ८१८००१०३०७

## युगंधरा प्रकाशन
नवकवी/कवयित्रींसाठी सुवर्णसंधी






काव्यकृष्ण,काव्यरेणुका,
काव्यसुलोचना,
काव्यलिलामृत,काव्यलक्ष्मी,
काव्यसुशीला,काव्यविठ्ठल,काव्यगोविंद व
काव्यनिसर्ग
या नऊ प्रातिनिधिक काव्यसंग्रहाच्या
यशानंतर युगंधरा प्रकाशन घेवून येत आहे
गंगा,यमुना,गोदावरी,सरस्वती,नर्मदा,सिंधू
कावेरी ही सात प्रातिनिधिक काव्यसंग्रह.
अधिक माहितीसाठी संपर्क
८३९०८१९४४६ या व्हॉट्सअॅप नंबरवर.

## दवा-खाना

# ‘प्रतिजैविकांचे जनक’ - ‘पॉल एहरलिच- गेरहार्ड जोहान्स पॉल डोमॅगक’


**ज्योतिर्मय साहित्य**

आजच्या काळात अँटिबायोटिक, अर्थात प्रतिजैविकांचा जो अखंड प्रवाह सुरु आहे त्याची तुलना एखाद्या भयंकर जलप्रपाताशीच करता येईल. आजचे त्यांचे हे कराल रूप पाहता सहसा कुणाचाही विश्वास बसणार नाही, की पेनिसिलीनसारखे प्रभावी अस्त्र माहित झाल्यावर देखील त्याची उपलब्धता अतिशय सीमित होती. एक वेळ अशी होती की रुग्णाच्या बेडपॅनमधून देखील त्याचे विलगीकरण करण्याच्या प्रक्रिया शोधल्या गेल्या. अशातच दुसऱ्या महायुद्धात सैनिकांचे जखमा चिघळल्यामुळे मृत्यू होत होते. त्यामुळे नामवंत औषधकंपन्यांनी पुढाकार घेत युद्धपातळीवर पेनिसिलिनची निर्मिती करण्यासाठी आपली संशोधक आणि अर्थशक्ती पणाला लावली. त्याचे फलित गोड होते. मात्र जोवर द्वितीय महायुद्ध सुरु होते तोवर पेनिसिलीन वर युद्धग्रस्त सैनिकांचा हक्क होता. ते संपल्यावरच जनतेला हा आरोग्यनिधी उपलब्ध झाला. मंडळी, प्रतिजैविकांवर याआधी कांही वैज्ञानिकांनी महत्वाचे कार्य केले होते.

पॉल एहरलिच-प्रतिजैविक केमोथेरपीचे जनक पॉल एहरलिच (जन्म १४ मार्च १८५४ पोलंड, मृत्यू- २० ऑगस्ट १९१५, जर्मनी) या महान जर्मन वैज्ञानिक आणि डॉक्टरांचे असाधारण कर्तृत्व म्हणजे त्यांनी वैद्यकशास्त्रातील अनेक शाखांचा प्रारंभ केला (हिस्टोलॉजी, मायक्रोबायोलॉजी, हिमॅटॉलॉजी, बायो-केमिस्ट्री, इम्युनोलॉजी आणि फार्माकॉलॉजी). त्यांच्या संशोधनामुळे केमोथेरपीची (प्रतिजैविकशास्त्र- इथे हा शब्द सर्वच इन्फेकशनवरील औषधांकरता अभिप्रेत आहे, मात्र आजकाल केमोथेरपी हा शब्द कॅन्सरच्या औषधोपचाराकरता वापरल्या जातो.) आणि ऑन्कोलॉजीची सुरुवात झाली. आर्सेनिक हे द्रव्य जिवाणूंविरुद्ध काम करते हे त्यांनी सिद्ध केले. त्यांनी प्रतिपिंडांचा (अँटीबॉडी) शोध लावला. घटसर्पावर प्रतिपिंडे दिल्यास त्याचा इलाज होऊ शकतो हे त्यांनी सिद्ध केले. त्यांना १९०८ साली इम्युनोलॉजीमधील (प्रतिकारशक्ती) योगदानाबद्दल औषध आणि शरीरशास्त्राचे पहिले नोबेल पारितोषिक (विभागून) देण्यात आले.


**लेखिका**
**डॉक्टर मीना श्रीवास्तव**

गेरहार्ड जोहान्स पॉल डोमॅगक-(जन्म ३० ऑक्टोबर १८९५, पोलंड, मृत्यू २४ एप्रिल १९६४, जर्मनी) हे जर्मन विकृतीशास्त्रज्ञ आणि जिवाणूशास्त्रज्ञ होते. त्यांनी आपल्या संशोधनाची सुरुवात प्रोन्टोसिल (एक रासायनिक रंग) पासून केली. हे औषध तोंडी देण्यात येत असे. ते उंदरांवर प्रयोग करीत असतांना एक १९३५ साली एक अघटित घडले. त्यांच्या हिल्डेगार्डे या एकुलत्या एक मुलीला भरतकाम करतांना सुई टोचली. मैत्रांनो, तेव्हाच्या काळी बऱ्याच पाश्चात्य देशात मुलीला बघायला पाहुणे आले की, त्यांना मुलीने कौशल्यपूर्वक आणि नजाकतीने केलेले सुंदर भरतकाम दाखवण्यात येत असे. तेव्हां हिल्डेगार्डे असेच खास भरतकाम करीत होती. सुईच्या दंशाने तिला स्ट्रेप्टोकॉकी या जिवाणूंचा संसर्ग झाला. आता तिच्या हाताचे शल्यविच्छेदन (कापणे) हा उपाय सांगण्यात आला, कारण मुलगी मरणाच्या दारात होती. त्यावेळी हताश झालेल्या डोमॅगक यांनी मागचा पुढचा विचार न करता आपल्या प्रयोगशाळेतील अर्धवट संशोधन झालेले प्रोन्टोसिल तिला दिले. महत्वाचे हे की हिल्डेगार्डे वाचली आणि पूर्ण बरी झाली. हे औषध तोंडातून द्यायची सुविधा होती. याच प्रोन्टोसिलच्या संशोधनासाठी डोमॅगक यांना १९३९ साली नोबेल पुरस्कार जाहीर झाला. मात्र जर्मनीच्या नाझी सरकारने डोमॅगक यांना तो घेण्याची परवानगी नाकारली. नंतर नाझी सरकारचा पाडाव झाल्यानंतर १९४७ साली त्यांनी हा पुरस्कार स्वीकारला आणि आपले ‘नोबेल व्याख्यान’ दिले. (मात्र पुरस्काराचे पैसे त्यांना मिळाले नाहीत). प्रोन्टोसिलच्या रचनेच्या आधारे वैज्ञानिकांनी सल्फोनामाईड या औषधसमूहाचा शोध लावला. हे प्रयोगशाळेत बनलेले पहिले कृत्रिम प्रतिजैविक!




मंडळी, जिवाणूंचे वर्गीकरण करण्याची सर्वात प्रचलित पद्धत म्हणजे १८८४ साली डेन्मार्कच्या हांस ख्रिश्चन ग्राम यांनी विकसित केलेल्या ‘ग्राम स्टेनिंग या पद्धतीने विशिष्ट रसायनाने जीवाणूंना न्हाऊ घालणे! कांही जिवाणूंच्या सेल वॉल (पेशीभित्तिका) जाडजूड असतात. त्यामुळे ते ग्राम स्टेनिंगनंतर सूक्ष्मदर्शकात जांभळे किंवा गर्द निळे दिसतात, तर कांहीच्या सेल वॉल पातळ असल्याने ते गुलाबी रंगाचे दिसतात. आपण म्हणाल, असू दे बापडा ‘रंग त्यांचा वेगळा’! वाघ म्हटलं तरी खातो अन बकरी म्हटलं तरी खाल्याशिवाय कुठं राहतो? या रंगांची रंजक माहिती पुढील भागात!

***

# महदंबा काव्यवाचन स्पर्धेत पूजा जाधव प्रथम

## मॉडेल कॉलेज येथे आद्य कवयित्री महदंबा काव्य वाचन  स्पर्धा उत्साहात

**ज्योतिर्मय साहित्य**

**घनसावंगी** - महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ मुंबई आणि महानुभाव साहित्य व शैक्षणिक प्रतिष्ठान दहीपुरी तालुका अंबड जिल्हा जालना दुसरे आचार्य भानू कवी महानुभव साहित्य संमेलनानिमित्त तालुकास्तरीय आद्य कवयित्री महदंबा काव्यवाचन स्पर्धेचे आयोजन मॉडेल कॉलेज घनसावंगी येथे दिनांक २० फेब्रुवारी रोजी करण्यात आले होते. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ रामराव चव्हाण हे होते तर प्रमुख उपस्थितीमध्ये नागपूर संत तुकडोजी महाराज विद्यापीठ येथील भगवान श्री चक्रधर स्वामी अध्यासन केंद्राचे संचालक प्रा भारत भूषण शास्त्री हे होते तसेच सुरेश मुकणे, वर्षा धाईत, डॉ मारुती घुगे यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी मार्गदर्शन करताना प्रा. भारत भूषण शास्त्री यांनी ‘‘मराठी साहित्यात आद्य कवियत्री  महादंबेचे महत्व अधोरेखित करत भगवान चक्रधर स्वामींच्या समतावादी विचारांवर प्रकाश टाकत कविता लेखन स्पर्धा आयोजना मागील भूमिका स्पष्ट केली. डॉ मारुती घुगे यांनी विद्यार्थ्यांना ‘‘कविता लेखन आपली माती, नाती, संस्कृती, अनुभूती आणि कविता या विषयावर मौलिक मार्गदर्शन करत शेतकरी जीवनावर आधारित कविता सादर केली यावेळी विद्यार्थ्यांनी शेती, शेतकरी, आईची ममता बाप माझा अशा  विविध विषयावर कविता सादर करून सर्वांना  मंत्रमुग्ध केले.




या स्पर्धेत प्रथम पुरस्कार पूजा जाधव, द्वितीय विकास घायतडक, तृतीय दिपाली भुतेकर, रवींद्र उगले, उत्तेजनार्थ गोपाल तौर तसेच माध्यमिक गटात सार्थक कांबळे, कृष्णा सरोदे यांनी प्रथम व द्वितीय पुरस्कार प्राप्त केला. विजेत्या विद्यार्थ्यांना  २४ फेब्रुवारी रोजी दुसऱ्या भानू कवी साहित्य संमेलनात मान्यवरांच्या हस्ते सन्मानित करण्यात येणार आहे. या वेळी परीक्षक म्हणून  डॉ मारुती घुगे डॉ बाळासाहेब सोनवणे डॉ ऋषीबाबा शिंदे हे होते. सूत्र संचालन डॉ कन्नूलाल विटोरे यानी केले डॉ भीमराव पुंडगे, डॉ ज्ञानेश्वर खोजे, प्रा उदय पवार, डॉ जया बागुल, विद्यार्थी विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.







## पाखरांची शाळा

एकदा झाडावर भरली
पाखरांची शाळा
शाळा गुरुजी बनले
कावळोबा दादा ।
पहिल्या रांगेत बसले
मोरोबा राजा
पंख उघडूनी शिकवी
नवनवी मजा ।
कबुतराने लिहिले
चोचीने धडे
वाऱ्याच्या तालावर
गातो पाढे ।
पोपट म्हणे
माझ्यामागून बोला
गोड गोड शब्द
हळूवार शिका ।
चिमणी म्हणाली
चिव चिव चिव
फांदीवर बसुनी
गाते आनंदी जीव ।
गरुड म्हणाला
मी राजा भारी
आभाळात माझी
दुनियाच  न्यारी ।
मधीच बोलले
घुबड मामा
रात माझी
शिकार साजी ।
आली उडत उडत
शोधत भक्ष्य अपुले
नाव माझे घार
नाही मानत हार ।
कोकीळाने गायले भावगीत
खंड्याने लावले संगीत
पाखरांनी धरला ताल
गिधडाने केली धमाल ।
अशी अमुची भरली
पाखरांची शाळा
हसत खेळत
शाळेचे नियम पाळा ।

**-प्रदिपगुरुजी पिंपळनेरकर**
(९८२३११३५९४)

## जाणता राजा

प्रसवली माता जिजाऊ
किल्ले शिवनेरी माजी
जन्मला पुत्र पोटी दैवी
नांव ठेवियले शिवाजी १
माता झाली गुरु त्याची
शिकवी सार्या विद्या त्याला
निपुण झाला सर्व कलांत
पुत्र शोभे शहाजीला २
बांधी तोरण स्वराज्याचे
जिंकून गड तो तोरणा
हिंदवी राष्ट्र स्वप्न लोचनी
घेऊन आखी तो धोरणा ३
जमवी मित्र जिवाभावाचे
अठरा पगड त्या जातीचे
सर्वच झाले साथी त्याचे
ज्यांना प्रेम या मातीचे ४
पाऊणशे वयमानाचा तो
शेलारमामा बने मावळा
मिसरुड ही ना फुटलेला
रायबा बांदल ही मावळा ५
गोब्राह्मण प्रतिपालक ऐसे
म्हणत तुला कुणी पाहिले
कुळवाडीभुषण ऐशा
बिरुदाने ही संबोधिले ६
ना केवळ तू बहूजनांचा
नाही फक्त अभिजनांचा
तु तर सगळ्या रयतेचा
जाती विरहित मनामनांचा ७
सार्या विभूती वाटून घेती
जातीपाती मधले नेते
तुच एकला राजा शिवबा
जात चिकटली नाही तुते ८
तुच लढावी राजा आता
जाती अंताची ती लढाई
ओरडून सांगू जगा आम्ही
सारे हिंदु भाई भाई ९

**-कवी नंदकुमार भणंग**
तीर्थपुरीकर. छ.संभाजीनगर

## जाणता राजा

मनुष्यप्राण्या कसे असावे
शिवबावानी मर्द असावे
अन्यायाची चाड ठेवुनी
अंतरी आपुल्या पेटून उठावे

रयतेसाठी सदा झटावे
सन्मानाने सदा जगावे
मायभूच्या हक्कासाठी
हसत जगावे लढत मरावे

जय भवानी जय शिवाजी
जयघोष नव्हे ;हा महामंत्र
राज्यकर्ता कसा असावा
ध्यानी घ्यावे शिवबाचे तंत्र

शत्रुलाही पूज्य असा हा
अवनी एकच झाला राजा
गर्व अन अभिमान जयाचा
तो जाणता शिवाजी राजा

जगी नृप न असा अन्य
जयाने भारत भूमी धन्य
समन्यायाचा राज्यकर्ता
नाही कोणावरी अन्याय
जय जिजाऊ जय शिवराय

**आबासाहेब कडू,**
**अमरावती**

## शिवराय

स्वराज्य निर्माणासाठी,
अन्याय निवारणासाठी.
अंतर्गत शत्रु मारण्यासाठी,
तयार व्हावा एक तरी शिवबा.

स्वराज्य असूनि स्वतंत्र नाही,
अत्याचाराने पिडले आहे.
शिवबा तुमच्या स्वराज्याला,
अनेक विकार जडले आहे.

सुरक्षित नाही रयत इथली,
रयतेला कुठले सुख नाही.
पाहुनी यांच्या स्थितीकडे,
कुणालाही दु:ख वाटत नाही.

शिवनेरीवरती जन्म घेऊन,
तेव्हा शिवबा आले होते.
अत्याचार निर्मुलनासाठी,
आजही शिवराय जन्मा यावे.

मोठ्यांच्या राजकारणामध्ये,
बळी जातात सामान्याचे.
शुद्ध राजकारण होण्यासाठी,
आजही शिवराय जन्मा यावे.

**श्रीपाद अनंत दसरे**
छत्रपती संभाजीनगर
९९७५९५०८०१

## रयतेचा वाली

जुन्नरच्या या पवित्र क्षेत्री
कुस जिजाऊची उजळली
दशदिशा आवाज घुमला
बाल राजा शिवाजी जन्मला  १
सारा मावळ प्रांत आनंदला
मातेचे संस्कार गुरू आदर
स्वराज्य रक्षण्या सेना तयार
लढवय्ये मावळे तत्पर  २
आदीलशाहीला कंटाळली
जनता झाली होती त्रस्त
राजाने दिले अभय सदा
रणनितीत राजा व्यस्त  ३
कुशल रणधुरंधर राजा
देई रयतेला अभय सदा
गड,कोट,किल्ले गनिमीकावा
तलवार, दांडपट्टा यत्रचर्म  ४
यवन कापे अति थरथर
जीवासजीव  देण्या मावळे
प्राणाची बाजी लावण्या तयार
असा तो राजा रणधुरंधर  ५
प्राणाची बाजी लावी जोवर
देती जीवास जीव तोवर
रयतेच्या गळ्यातील ताईत
कुशल नेतृत्व दूरदृष्टी अपार  ६
मराठी मनाचा अभिमान
राष्ट्रधर्माचा उजळला दीप
सदैव रक्षण मातृभूमीचे
असा तेजाळला नंदादीप  ७
यावत चंद्र दिवाकर असे
नाव राहील सदोदित
जाणता राजा असे एक
शिवाजी महाराज, महाराज  ८
जय हिंद

**सौ, ऊज्वला धर्माधिकारी**
पुणे.

## राजे शिवछत्रपती

अचाट होती निर्णयक्षमता
कर्तव्याची जाण सजगता..
अवतरला सह्याद्रीवरती
सुर्यासम भूपती तळपता..
सिंहासनाधीश्वरा शोभते
मनाची बहु श्रीमंती..
शंभू शिवास अर्पण
हिंदवी स्वराज्य निर्मिती ..
तलवार मराठ्यांची
लखलख तेजाळलेली
स्वराज्यासाठी जात
मावळ्यांनी एक मानली..
प्रताप धैर्य संग्राम
ललकार  सह्याद्रीस
छत्रपति शिवराय जन्मले
पावन केले मायभूमीस
जगण्याचे कारण
निर्भयाचे उदाहरण..
प्रजापती दक्ष एकमेव
शिवछत्रपती शासन..

**- प्रतिभा महादेव चौगले**
कोल्हापूर

## प्रेरणा

संकटाच्या वेळी खरे
दोन प्रेमळ शब्द
प्रेरणा देती मनाला
दु:ख दूर करुन
खंबीरतेने घेवून निर्णय
आनंद घ्यावा क्षणाला

प्रेरणेने मिळते बळ
नव कार्यासाठी खरी
उभारी घेते मन
स्वः कार्यावर नेहमी
विश्वास ठेवून पहा
आनंदी जगावे जीवन

**- संध्याराणी जयहिंद कोल्हे**
**काव्यसंध्या कळंब जि.धाराशिव**

हे जरनल संपादक व प्रकाशक संजय व्यापारी यांनी १०१, सी विंग, सिल्व्हर स्पेस सोसायटी,  विशाल नगर, पिंपळे निलख, पुणे-४११००१ (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. (पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.
या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद पुणे न्यायालयाच्या कक्षेत) E-mail-jyotirmaysahitya@gmail.com, Mob. 7743918559